पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर
तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसूचना/ ९२० /२०२४ दि. १५/०६/२०२४

**–: वाहतूक नियंत्रण अधिसूचना :–**

**ज्याअर्थी,** अंबरनाथ वाहतूक उपविभागाचे हद्दीत दि. १७/०६/२०२४ रोजी **'बकरी ईद' एक दिवस मागे किंवा पुढे चंद्र दर्शनानुसार** साजरा करण्यात येणार आहे. सदर दिवशी मुस्लिम धर्मी मोठया प्रमाणात पहाटे पासुनच नमाज पडणेसाठी वेगवेगळया मशिदीमध्ये मोठया संख्येने जमा होतात. सदर परिसरात वाहतूक कोंडी होऊ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

**त्याअर्थी,** मी **डॉ. विनयकुमार मे. राठोड, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसुचना जारी करीत आहे. :–

**प्रवेश बंद –** १) कैलास नगर मॉर्डने चिकन सेंटर कडून फातिमा शाळेच्या बाजूला साऊथ इंडियन शाळेकडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **कैलास नगर मॉर्डने चिकन सेंटर** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदर वाहने महाराष्ट्र हौसिंग बोर्ड कडून उलनचाळ मार्गे इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** २) कोहोजगाव नाका, चिंचपाडा कडून कृष्णा ज्वेलर्स गैबनशहा दर्गा मैदानासमोर तसेच ए वन चपाती सेंटर, कमलाकर नगर कडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **कोहोजगाव नाका, चिंचपाडा** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदर वाहने कोहोजगाव नाका, चिंचपाडा कडून उलनचाळ मार्गाने उलनचाळ येथून आयेशा किराणा स्टोअर्स येथून डावे वळण घेवून दिपक नगर चौक येथून डाव्या बाजूने कृष्णा ज्वेलर्स गैबनशहा दर्गा येथून पुढे चिंचपाडा मार्गे इच्छित स्थळी जातील.

सदर अधिसूचना **'बकरी ईद' एक दिवस मागे किंवा पुढे चंद्र दर्शनानुसार** दि. १६/०६/२०२४ रोजी रात्रौ २३:०० ते दि. १७/०६/२०२४ रोजी रात्रौ २३:०० वाजेपावेतो अंमलात राहील.

सदर वाहतूक नियंत्रण अधिसूचना पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रुग्णवाहिका, ग्रीन कॉरीडोर, ऑक्सिजन गॅस वाहने व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू राहणार नाही.

( डॉ. विनयकुमार मे. राठोड )
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर.

**प्रति,**

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे
२/– सदर अधिसूचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

**प्रत माहितीसाठी सादर,**
मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर
मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर
मा. अपर पोलीस आयुक्त, पूर्व प्रादेशिक विभाग, कल्याण
मा. जिल्हाधिकारी, ठाणे
मुख्याधिकारी, अंबरनाथ नगरपरिषद, अंबरनाथ

**प्रत कार्यवाहीसाठी** :—
उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, कल्याण
विभाग नियंत्रक, महाराष्ट्र राज्य परिवहन, कल्याण/विठ्ठलवाडी
पोलीस उपायुक्त, परिमंडळ—४, उल्हासनगर व विशेष शाखा, ठाणे

**प्रत** :— पोलीस उपायुक्त, आर्थिक गुन्हे, ठाणे शहर
२/— सदर अधिसूचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्दी होणेस विनंती आहे.

**प्रत** :— समन्वय अधिकारी, ९ ए. एस. कक्ष, ठाणे
२/— सदर अधिसूचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

**प्रत** :— सपोआ उल्हासनगर वाहतूक उपविभाग/पोनि, उल्हासनगर, विठठलवाडी, अंबरनाथ वाहतूक उपविभाग, ठाणे शहर